# कोरोना योद्ध्यांना रस माधव वटी

**पुणे, ता. ४ :** क्विक हील व श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्राने एक लाख कोरोना योद्ध्यांना रस माधव वटी हे रोगप्रतिकारशक्तीवर्धक औषधाचे वाटप करण्याचे ठरवले आहे. या औषधाने सर्दी, खोकला, घसा दुखणे, अंगदुखी, थकवा अशा सामान्य विषाणूजन्य संक्रमणाच्या लक्षणांपासून सुरक्षा मिळते. तसेच पचन, रक्तशुद्धी व श्वासोच्छ्वासाच्या तक्रारीतही लाभ होतो.

क्विक हीलने दोन महिन्यांत कोरोनाने प्रभावित झालेल्या गरजूंना रेशन किट, अन्नपदार्थ, तात्पुरत्या छावण्या, पीपीई किट पुरवण्यात पुढाकार घेतला. तसेच प्रधानमंत्री निधीतही योगदान दिले. 'एक जबाबदार नागरिक म्हणून कोरोना योध्यांना आयुर्वेदिक औषधांद्वारे सुरक्षित ठेवण्यासाठी श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय आणि संशोधन केंद्राबरोबर सहकार्य करण्यात आम्हाला आनंद होत आहे. भविष्यातही आम्ही देशासाठी लढणाऱ्या योद्ध्यांच्या संरक्षणासाठी पुढाकार घेत राहू,' असे क्विक हील टेक्नॉलॉजीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलाश काटकर म्हणाले.

डॉक्टर, नर्स, पोलिस कर्मचारी, स्वच्छता कामगार तसेच वितरकांनी कोरोनाविरोधी लढ्यात प्राण पणाला लावले आहेत. हे कर्मचारी बाधित व्यक्तींच्या संपर्कात येतात. त्यामुळे त्यांना संक्रमणाचा धोका असतो. क्विक हीलसोबत आमच्या रस माधव वटी या  औषधाद्वारे त्यांना एक सुरक्षा कवच देऊ शकू. हे औषध कोल्हापूर येथील धर्मादाय संस्था श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्राने बनवले. आमच्या या पुढाकाराने या लढ्यास थोडेसे बळ मिळेल,' असे श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्राचे अध्यक्ष आनंदनाथ सांगवडेकर यांनी सांगितले.